दाखल दिनांक : ०६/१०/२०२०
स्विकारल्याची तारीख : ०६/१०/२०२०
न्यायनिर्णय दिनांक : ०६/११/२०२३
कालावधी : व. म. दि.
०३ ०१ ००

**विदयमान न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंगरूळपीर जि. वाशिम यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी श्री. आर.एस.मानकर)**

**नियमित फौजदारी प्रकरण क्र.२८६/२०२२** **निशाणी क्र.५२**

सरकार तर्फे
पोलीस स्टेशन अधिकारी,
पोलीस स्टेशन, मंगरूळपीर, ता. मंगरूळपीर,
जि.वाशिम ....अभियोग पक्ष

**—विरुद्ध—**

१. गुलाब उत्तमराव वावगे,
वय ४५ वर्षे, धंदाः— शेती.

२. अविनाश गजानन वावगे,
वय २१ वर्षे, धंदाः— शेती.

३. शाम गजानन वावगे,
वय २१ वर्षे, धंदाः— शिक्षण.
सर्व राः— पेडगांव ता. मंगरूळपीर, जि. वाशिम. ..... आरोपी

**आरोप :—भारतीय दंड संहितेचे कलम २९४,३२३,५०६(२) अन्वये**
**अभियोग पक्षातर्फे :— श्री. सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एम. जी. राउत**
**आरोपीतर्फे विधीज्ञ :— श्री. बी.एम. ठाकरे वकील**

## न्यायनिर्णय
## (घोषणा दिनांक ०६ नोव्हेंबर, २०२३)

आरोपीविरूध्द मंगरूळपीर पोलीस स्टेशन मार्फत भारतीय दंड विधान कलम २९४,३२३,५०६(२) नुसार. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल

केले व खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात.**

२) फिर्यादी गजानन सुभाष देशमुख रा. पेडगांव ता. मंगरूळपीर जि. वाशिम यांनी त्यांच्या फिर्याद मध्ये असे कथन केले आहे की, दि. ११/०७/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता आरोपींनी त्यांच्या मालकीच्या जागेतुन डवरे व बैल नेले त्यामुळे त्या डव–याचा धक्का फिर्यादीच्या मोटरसायकला लागुन मोटरसायकल खाली पडली व फिर्यादी हे सर्व आरोपींना समजावून सांगण्यास गेले असता त्यावेळी आरोपी गुलाबा वावगे यांनी फिर्यादीला “ मादरचोद मी रस्त्याने डवरे नेले, छिनालच्या तु लय माजला, भोसडीच्या ” अशी अश्लील शब्दात शिवीगाळ केली. त्यानंतर आरोपी शाम गजानन वावगे व अविनाश गजानन वावगे या दोघांनी फिर्यादीला लोटलाट करुन थापडाबुक्यांनी मारहाण केली व जिवाने मारण्याची धमकी दिली त्यामुळे फिर्यादीने आरोपींविरूध्द पोलीस स्टेशन मंगरूळपीर येथे रिपोर्ट दिला.

३) फिर्यादीच्या लेखी रिपोर्टवरून पोलीस स्टेशन अधिकारी मंगरूळपीर यांनी आरोपी विरूध्द भा.दं.वि. कलम २९४,३२३,५०६(२) नुसार अपराध क्र.९४९/२०२० अन्वये गुन्हा दाखल केला. गुन्ह्याचा तपास पोलीस छोटे पप्पुवाले यांनी केला. त्यांनी घटनास्थळावर जावून पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामे तयार केले. त्यांनी फिर्यादी व साक्षीदारांचे बयाण नोंदविले आणि तपास पुर्ण झाल्यानंतर न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

४) आरोपींविरूध्द नि.क्र.२१ अन्वये भा.दं.वि. कलम २९४,३२३,५०६(२) नुसार दोषारोप निश्चित केले. दोषारोप आरोपींना त्यांच्या मातृभाषेत वाचुन व समजावुन सांगण्यात आले. त्यांनी गुन्हा नाकबुल केला आणि संपरीक्षा घेण्याची मागणी केली. आरोपींविरूध्द पुरावा आल्यामुळे त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे नि.क्र.४९ ते ५१ वर निवेदन नोंदविण्यात आले व आरोपींनी त्यांच्या विरुध्द फिर्यादीने खोटी केस केल्याचा

बचाव घेतला.

५) अभिलेखावर आलेल्या साक्षच्या अनुषंगाने व दोन्ही बाजुने केलेल्या युक्तीवादावरून खालील मुद्दे माझे समक्ष विचारार्थ उपस्थित होतात. मी माझा निष्कर्ष कारणासह त्यावर खालीलप्रमाणे नोंदवितो.

| अ.क्र. | मुददे् | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, फिर्यादमध्ये सांगीतल्याप्रमाणे दिनांक ११.०७.२०२० रोजी रात्री ११.०० वाजेच्या दरम्यान ग्राम पेडगांव येथे आरोपींनी इतरांना त्रास होईल अशाप्रकारे सार्वजनिक ठिकाणी फिर्यादीस 'छिनालच्या तु लय माजला, भोसडीच्या' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केली आणि त्याव्दारे भा.दं.विचे कलम २९४ व सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय? | ....नाही. |
| २ | दुसरे असे की, वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपी शाम वावगे व अविनाश वावगे यांनी फिर्यादीस लोटलाट क३न थापडाबुक्यांनी मारहाण करुन इच्छापूर्वक दु:खापत पोहचविली आणि त्याद्वारे तुम्ही भा.दं.वी.कलम ५०६(२) व सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय? | ....नाही. |
| ३ | शेवटी असे की, वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी देवून त्यांचे मनात दहशत बसविली आणि त्याद्वारे तुम्ही भा.दं.वी. कलम ५०६(२) व सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय? | ....नाही. |
| ४ | अंतिम आदेश काय.? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>का र ण मि मां सा</u>

६) आरोपींविरूध्द गुन्हा शाबीत करण्याकरिता अभियोग पक्षामार्फत एकुण ०६ साक्षीदार तपासण्यात आले. साक्षीदार क्र.०१ फिर्यादी गजानन सुभाष देशमुख यांची साक्ष नि.क्र.२५ वर नोंदविण्यात आली, साक्षीदार

क्र.०२ घटनास्थळ पंच गजानन वामनराव गावंडे यांची नि.क्र.२८ वर नोंदविली, सा.क्र.०३ ऋषिकेश रमेश देशमुख यांची साक्ष नि.क्र.३२ वर नोंदविली, सा.क्र. ०४ अभिषेक राजेंद्र देशमुख यांची साक्ष नि.क्र.३३ वर नोंदविली, सा.क्र.०५ सुभाष महादेव देशमुख यांची साक्ष नि.क्र.३४ वर नोंदविली आणि साक्षीदार क्र.०६ तपास अधिकारी छोटे पप्पुवाले यांची साक्ष नि.क्र.३६ वर नोंदविण्यात आली.

७) तोंडी पुराव्याशिवाय अभियोग पक्षाने आपली भिस्त फिर्याद निशाणी क्र.२६, प्रथम खबरी अहवाल निशाणी क्र.२७, घटनास्थळ पंचनाम्यावरील सही निशाणी क्र.३७, इ. दस्तऐवजावर ठेवली. तसेच आरोपींनी त्यांच्यावरील दोषारोपांचे खंडण करण्याकामी साक्षीदारांची साक्ष नोंदविलेली नाही अथवा पुरावा दिलेला नाही. आरोपीचे फौ.प्र.सं. चे कलम ३१३(१)(ब) चे निवेदन निशाणी ४९ ते नि.क्र.५१ वर नोंदविण्यात आले. फिर्यादीने आरोपींना खोटया केस मध्ये गोवल्याचा बचाव घेतला असल्याचे सांगितले.

८) अभियोग पक्षाने भा.दं.वि. चे कलम २९४,३२३,५०६(२) अंतर्गत दोषारोप शाबीत करणे कामी नि:संशयपणे अभिलेखावर आणणे गरजेचे आहे की, आरोपी क्र.०१ याने फिर्यादीस सार्वजनिक ठिकाणी अथवा सार्वजनिक ठिकाणाजवळ अश्लील भाषेत शिवीगाळ केली व आरोपी क्र.०२ ते ०३ यांनी फिर्यादीला लोटलाट करुन थापडाबुक्यांनी मारहाण करुन जिवाने मारण्याची धमकी दिली हया बाबी सिध्द होणे आवश्यक आहे.

**<u>मुद्दा क्र.०१ करीता:—</u>**

९) दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी वकील श्री. एम. जी. राउत यांचा युक्तीवाद ऐकला त्यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये असे सांगितले आहे की, जरी पंच साक्षीदार हे अभियोगपक्षास फितुर झाले असले तरी फिर्यादीने त्यांच्या साक्षीमध्ये आरोपींनी

त्यांना सार्वजनिक ठिकाणी म्हणजेच रस्त्यावर अश्लील भाषेत शिवीगाळ केली व आरोपी क्र.०२ ते ०३ यांनी फिर्यादीला लोटलाट करुन थापडाबुक्यांनी मारहाण केली आणि जिवाने मारण्याची धमकी दिली ही बाब फिर्यादमध्ये व त्यांच्या सरतपासामध्ये परस्पर पुरक सांगितलेली आहे. तसेच फिर्यादीच्या साक्षीत कुठलीही तफावत अथवा अतिश्योक्ती सुधारणा आल्याचे दिसुन येत नाही. तसेच घटनास्थळ पंच हे अभियोगपक्षास फितुर झाले असले तरी घ टनास्थ पंच यांनी घटनास्थळ पंचनाम्यावर त्यांची सही असल्याचे मान्य केले आहे त्यामुळे घटनास्थळ पंचनामा सिध्द झालेला नाही. अभियोगपक्षाने आरोपीवरील दोषारोप हा संशयापलीकडे सिध्द केलेला आहे त्यामुळे आरोपीला योग्य ती शिक्षा दयावी अशी विनंती केलेल आहे.

१०) याउलट आरोपी तर्फे श्री. बी. एम. ठाकरे वकील त्यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये असे सांगितले आहे की, अभियोगपक्षाने घटनास्थळ हे सार्वजनिक ठिकाण होते अथवा घटना ही सार्वजनिक ठिकाणी घडली याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर आल्याचे दिसुन येत नाही. तसेच आरोपींनी फिर्यादीला 'तुझ्या मायला झव' अशी शिवीगाळ केल्याचे फिर्यादमध्ये कुठेही सांगितलेले नाही. परंतु सदर बाब ही सदर फिर्यादीने त्यांच्या पुराव्यात सांगितलेली आहे. तसेच घटनास्थळ हे फिर्यादीची खाजगी जागा होती ही बाब फिर्यादीने मान्य केलेली आहे. तसेच आरोपीने फिर्यादीला काय मारहाण केली, कुठे मारहाण केली ही बाब वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष न नोंदविल्यामुळे सिध्द झालेली नाही. तसेच आरोपीने त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली असे सांगितले असले तरी त्यांना नेमक्या कोणत्या आरोपीने जिवे मारण्याची धमकी दिली ही बाब स्पष्टपणे सांगितलेली नाही. त्यामुळे अभियोगपक्षाने आरोपीवरील दोषारोप हा संशयापलीकडे सिध्द केलेला नाही. त्यामुळे आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात यावी अशी विनंती केली.

११) सा.क्र.०१ फिर्यादी गजानन हा घटनेचा मुख्य साक्षीदार

असल्यामुळे त्यांची साक्ष सुरुवातीला विवेचनाकरीता घेणे क्रमप्राप्त ठरते. सा. क्र.०१ फिर्यादी गजानन यांच्या पुराव्यामध्ये असे आले आहे की, घटना ही दोन वर्षापूर्वी सकाळी ११.०० वाजता फिर्यादीच्या घरासमोर घडली होती. सदर दिवशी आरोपींने फिर्यादीची गाडी डव—याचा धक्का देवून खाली पाडली त्यावेळी फिर्यादीने आरोपीला म्हटले की, 'तुम्ही डवरे रस्त्याच्या बाजुने न्यायचे असते माझे जागेत कशे आणले' असे म्हटले असता त्यावेळी आरोपी गुलाब याने फिर्यादीस 'तुया मायले झव, मादरचोदा' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केली. सदर फिर्यादीच्या फिर्यादचे अवलोकन केले असता सदर फिर्यादमध्ये आरोपी गुलाब वावगे याने फिर्यादीला 'मादरचोदा, छिनालच्या, तु लय माजला भोसडीच्या' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचे नमुद केलेले आहे. परंतु 'छिनालच्या, तु लय माजला भोसडीच्या' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केली ही बाब सदर साक्षीदाराने त्यांच्या पुराव्यामध्ये सांगितलेली नाही. तर आरोपी गुलाब याने फिर्यादीस 'तुया मायले झव' अशी शिवीगाळ केल्याचे सांगतात परंतु सदर शिवीगाळ आरोपी गुलाब याने केल्याचे सदर फिर्यादी यांच्या साक्षीमध्ये कुठेही सांगत नाही. त्यामुळे साक्षीदाराच्या साक्षीतील अश्लील शिवीगाळ केल्याचा मजकुर व फिर्यादमध्ये शिवीगाळ केल्याच्या शिव्या हया वेगवेगळया असल्याने तफावत निर्माण झालेली आहे.

१२) त्यानंतर फिर्यादी गजानन यांच्या उलटतपासामध्ये आरोपीने फिर्यादीच्या जागेतुन डवरे नेले ही बाब स्पष्टपणे मान्य केलेली आहे. त्यानंतर आरोपीच्या वकीलांनी फिर्यादीला प्रश्न विचारला की, तुम्ही गुलाब यांच्या शेतात गुलाब यांना रस्त्यावरुन डवरे नेवू दिले नाही म्हणून गुलाब याने तुमच्या विरुध्द फिर्याद दिली होती काय? त्यावर सदर फिर्यादीने उत्तर दिले की, त्यांच्या हक्काच्या जागेतुन रमेश पवार यांना डवरे नेवू दिले नव्हते. म्हणजेच सदरची घटना ही फिर्यादीच्या हक्काच्या जागेत म्हणजेच खाजगी जागेत झाली व सार्वजनिक जागेजवळ अथवा सार्वजनिक जागेत झाली नाही ही बाब

फिर्यादीच्या साक्षीतुन अभिलेखावर आल्याचे स्पष्टपणे दिसून येते. त्यानंतर सा. क्र.०३ साक्षीदार ऋषिकेश यांनी घटना ही ग्राम पेडगाव येथे सुभाष महादेवराव देशमुख यांच्या घराच्या समोर घडली होती असे सांगतात. त्यामुळे नेमकी सदरची घटना कुठे घडली याबाबत संशय निर्माण होतो. तसेच सा.क्र. ०३ यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, सन २०२० मध्ये जुलै महिन्यात ते पेडगांव सोडुन खाजगी नौकरीसाठी बाहेर गावी गेले होते. पोलीसांनी त्यांच्याकडे विचारपूस केली नव्हती व त्यांचे पोलीसांनी बयान सुध्दा नोंदविले नव्हते ही बाब स्पष्टपणे मान्य केलेली आहे त्यामुळे त्यांच्या साक्षीत विश्वासहर्यता दिसुन येत नाही. त्यानंतर सा.क्र.०४ अभिषेक यांच्या साक्षीमध्ये आरोपींनी फिर्यादीला काय शिवीगाळ केली ही बाब कुठेही सांगितलेली नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराला फितुर घोषीत करुन सहा.सरकारी अभियोक्ता यांनी उत्तरसुचक प्रश्न विचारले व त्यामध्ये त्यांनी आरोपी गुलाब वावगे याने फिर्यादीला 'मादरचोद मी रस्त्याने डवरे नेले, छिनालच्या तु लय माजला, भोसडीच्या' अशी शिवीगाळ केल्याचे सांगितले. परंतु फिर्यादीने त्यांच्या सरतपासामध्ये सदर शिवीगाळ केल्याचे सांगितलेले नाही. याउलट आरोपी गुलाब याने फिर्यादीला 'तुझ्या मायला झव' अशी शिवीगाळ केली आहे असे सांगितलेले असल्याने सदर साक्षीदार व फिर्यादी यांच्या साक्षीमध्ये सुसंगतपणा दिसून येत नाही त्यामुळे त्यांच्या साक्षीत संशय निमार्ण होतो.

१३) त्यानंतर सा.क्र.०५ सुभाष यांची साक्ष अभियोगपक्षाने नोंदविली त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये तिन्ही आरोपींनी 'छिनालच्या, भोसडीच्या, तु लय माजला' अशी शिवीगाळ केली असे सांगितले. परंतु फिर्यादीने त्यांच्या साक्षीमध्ये सदर शिवीगाळ केल्याचे सांगितलेले नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष व फिर्यादीची साक्ष यांच्यामधील पुराव्याची साखळी जुळुन येत नाही.

१४) त्यानंतर सा.क्र.०६ तपासी अंमलदार छोटे बल्ली पप्पुवाले हे त्यांच्या पुराव्यामध्ये असे कथन करतात की, त्यांनी फिर्यादीसमक्ष नि.क्र.३७ वरील घटनास्थळाचा पंचनामा तयार केला त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगितले. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी युक्तीवाद करुन असे सांगितले की, पंच साक्षीदार क्र.०२ गावंडे यांनी अभियोगपक्षास पुरक अशी साक्ष दिली नसली तरी अभियोगपक्षाने घटनास्थळ पंचनामा हा तपासी अंमलदार यांच्याकडुन सिध्द केलेला आहे. परंतु सदर पंचनामा साक्षीदार गावंडे हे स्वतंत्र साक्षीदार आहेत ते अभियोगपक्षा विरुध्द का खोटे बोलत आहे ही बाब अभियोगपक्षाने अभिलेखावर आणल्याचे दिसून येत नाही. सदर सा.क्र.०६ तपासी अंमलदार पप्पुवाले यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, त्यांच्या तपासात असे निष्पन्न झाले की, आरोपी याने त्याचे डवरे फिर्यादीच्या मोटरसायकला खेटुन नेले त्या कारणावरुन फिर्यादीने आरोपीस विचारणा केली असता आरोपी क्र.०१ याने फिर्यादीस 'मादरचोद, छिनालच्या, खुप माजला का' अशी अश्लील भाषेत शिवीगाळ केली असे सांगितले. परंतु फिर्यादीने त्यांच्या साक्षीमध्ये आरोपी क्र.०१ याने 'तुया मायले झव, मादरचोदा' अशी शिवीगाळ केल्याचे सांगितलेले आहे. त्यामुळे सदर साक्षीदाराच्या साक्षीस व फिर्यादीच्या साक्षीमध्ये सुसंगतपणा असल्याचे अभिप्रेत होत नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.०१ चे उत्तर नकारार्थी नोदवित आहे.

**<u>मुददा क्र.०२ व ०३ करीता:—</u>**

१५) फिर्यादी सा.क्र.०१ गजानन त्यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये आरोपी क्र.०२ व ०३ यांनी त्यांना थापडबुक्की केली असे सांगितलेले आहे. परंतु कुठे थापडबुक्की केली ही बाब सांगितलेली नाही तसेच त्यामुळे त्यांना काय दुखापत झाली ही बाब वैद्यकीय अधिका—याची साक्ष अभियोगपक्षाने घेवून साबीत केल्याचे दिसून येत नाही. जरी सा.क्र.०४ अभिषेक, सा.क्र.०५ सुभाष यांच्या साक्षीमध्ये आरोपींनी फिर्यादीला डव—याच्या काडीने व

थापडाबुक्याने मारहाण केल्याचे सांगितले असले तरी वर चर्चा केल्याप्रमाणे सदर दुखापत ही वैद्यकीय साक्षीदाराची साक्ष घेवून अभियोगपक्षाने सिध्द केलेली नाही. त्यापुढे फिर्यादीच्या साक्षीमध्ये आरोपीने धमकी दिली असे सांगितलेले आहे परंतु कोणत्या आरोपीने धमकी दिली ही बाब त्यांनी स्पष्टपणे सांगितलेली नाही. त्यामुळे आरोपींने फिर्यादीला थापडाबुकयाने व काठीने मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली ही बाब सबळ पुराव्याशिवाय अभियोगपक्षाने सिध्द केल्याचे दिसुन येत नाही.

१६) एकंदरीत अभियोगपक्षाच्या पुराव्याचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता अभियोग पक्षाने आरोपींवरील दोषारोप संशयापलीकडे सिध्द केले नाही असे माझे स्पष्ट मत आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.०२ व ०३ चे उत्तर नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.०४ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आरोपी १. गुलाब उत्तमराव वावगे, २. अविनाश गजानन वावगे, ३. शाम गजानन वावगे, सर्व रा:—पेडगांव ता. मंगरूळपीर, जि. वाशिम. यांची भारतीय दंड विधान कलम २९४,३२३,५०६(२), सहकलम ३४ अन्वये या दंडनीय अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीने दिलेले जामीनकदबे व जातमुचलके रद्द करण्यात आले.

३. प्रस्तुत प्रकरणात जप्त मुददेमाल नसल्याने मुददेमालाबाबत आदेश नाही.

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७—अ प्रमाणे १५,०००/—रूपयांसाठी प्रत्येकी वैयक्तिक बंधपत्र आणि तितक्याच रक्कमेचे जामीनदारांचे बंधपत्र सादर करावे.

(न्यायानिर्णय न्यायालयीन वेळेत व खुल्या कक्षात उद्घोषीत करण्यात आला.)

स्वा/—
(आर. एस. मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.२, मंगरूळपीर.

दिनांक: ०६/११/२०२३